Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV

18

# ग्रामीण कथा

**प्रा. डॉ. पंकज रघुनाथ देवरे**
मराठी विभाग प्रमुख,
कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सोनगीर, तालुका जिल्हा धुळे

भारतीय समाजाचा पोशिंदा शेतकरी, शेतमजूरच सुखावह नाही. पारंपारिक शेतीत दारिद्य हे कायमचेच होते. नव्या धोरणांमुळे परिस्थितीत बदल होईल असे वाटत असताना शेती महागडी होत आहे. कर्जाशिवाय शेती करणे, कसणे अवघड झाले. ऊस, कांदा, कापूस, टमाटा यासारख्या नगदी पिकांच्या देखील शेतीमालाला रास्त भाव मिळत नाही. शेतकरी खाजगी सावकार, सरकारी, सहकारी बँका यांचा कर्जदार झाला. शेतीवर अवलंबून असणारे सर्व घटकाचे जीवनमान मोडीत निघाले आहे. शेतकरी आत्महत्या करीत आहेत. या आत्महत्यांनी ग्रामीण दारिद्य, आर्थिक विषमता, असहाय्यता आणि सरकारी धोरणाबाबत असंतोष निर्माण होत आहे.

वाढत्या शेतकरी आत्महत्यांचा परिणाम समाजात होऊन शेतीविषयी नकारात्मक प्रचार सुरू होऊन समाजात नकारात्मक स्थिती निर्माण झाली. या घटनांचा राजकीय पुढारी राजकारणात वापर करून घेऊ लागले. आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना मिळणाऱ्या मदत निधी वाटपात भ्रष्ट प्रवृत्ती वाढल्या. वाढत्या माध्यमांचा या घटनांकडे व्यावसायिक दृष्टिकोन या सगळ्यातून महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, प्रादेशिक विभाग ढवळून निघाले. याचे अत्यंत वास्तववादी चित्र सदानंद देशमुख यांनी आपल्या कथांमधून रेखाटलेले आहे.

वामनदादाला परिसरातील झाडे देखील गावातील माणसांप्रमाणे उदास दिसत होती. त्या त्या झाडाला त्या त्या माणसाप्रमाणे उतरती कळा लागली होती. झाडांबरोबर ती माणसं त्याला दिसत होती. जसे देवमनदादाने मासलगावच्या बनुशेठ सावकाराचे पेरणीच्या हाती त्याने तीस हजार रुपये कर्जाने काढले होते. अवकाळी पावसाने त्याचे पिके सडतात. डबल झालेल्या कर्जापायी बनूशेठ सावकार वावराची खरेदी करून मागतो. त्यापायी देवमनदादा भयभीत झाला होता. देवमनदा ज्या आंब्याच्या झाडाखाली पाणी लागलं आणि द्राक्ष, केळी बागायतदार होण्याचे स्वप्न आखत त्याच आंब्याच्या झाडाखाली डेगाक्रॉनच औषध पिऊन आत्महत्या करतो. देवमनदा आत्महत्येनंतर त्या घटनेचे तीव्र पडसाद त्याच्या मनावर उमटतात. या घटनेमुळे एकूण परिसरावर होणाऱ्या परिणामाचा तो विचार करतो. या घटनेसंदर्भात गावातील रायभान खारोडे म्हणतो, बाकी वामनदा मरणी मरावं त आसं मरावं. काय गवगवा झाला त्याच्या मरणाचा. मौतीवर जत्राच उलटली होती नं. सभापती, झेड.पी.चा अध्यक्ष, खासदार काय मंत्री काय... पेपरात हप्ता भर बातम्या. जगत होता तेव्हा कुत्रंबी हुंगत नव्हतं. मेल्यावर एकदम असं वाटलं, जसा काय कोणी नेताच मेला. पुन्हा लाख दोन मदतबी भेटली म्हणतात त्याले मुख्यमंत्री निधीतून, पालकमंत्री निधीतून. मरावं त असं मरावं. नाई त आपल्या कास्तकाराचं मरण अन ढोरचं मरण यात काई फरक नाही. शेतकरी आत्महत्येनंतर परिसरातील चर्चा, त्याचा सामाजिक परिणाम या सर्व घटनांचा विचार या कथेत येतो. सुन्या हा व्यवहारी विचार करतो. ह्या देशात शेतकरीच कर्जाले भेदरून मरतो. लय कारखान्यावाले अन व्यापारी कर्ज बुडवतात. नेते लोक, देशातले मातीत घालतात.

देवमनदाच्या आत्महत्येनंतर मिळणाऱ्या मदतीत त्याचा मुलगा रमेशा विटांचे पक्के घर बांधतो. तर सुन्याला तो चुकी करतो आहे असे वाटते. त्या पैशांचा भांडवल म्हणून वापर करावा असे त्याला वाटते. त्याच्यासारखा पैसा आपल्याला मिळायला पाहिजे, असे त्याला वाटते. सुन्याच्या हा 'मनसुबा' वामनदा आणि रुखाई अधिकच अस्वस्थ करतो.

'महालुट', 'उठावण' या कथेत व्यापारी वर्ग शेतकरी वर्गाची कशी महालुट करतात. व्यापारी वर्गाकडून होणारी पिळवणूक, भ्रष्टाचार यामुळे शेतकऱ्यांच्या मनाच्या उलाढालीचे चित्रण आलेले आहे. शेतकरी कष्ट करून शेती पिकवतो. अनेक संकटांना तोंड देऊन पिकवलेला शेतमाल शहरातील बाजारपेठेत आणतो. पण त्याने काबाडकष्ट करून पिकवलेल्या मालाची किंमत कोणीतरी वेगळाच दलाल, व्यापारी ठरवीत असतो. त्याला त्याच्या उत्पादन खर्चाएवढा देखील बाजारभाव मिळत नाही. शेतीसाठी आवश्यक असणारे अवजारे, औषधे, खते, पंप, बियाणे यांच्या किमती सतत वाढतात. पण शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळत नाही. सततची नापिकी, दुष्काळ, शेतमालाला हमीभाव न मिळणे यातून वाढत्या शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न बिकट होत आहे.

उत्तम बावस्कर यांचे 'बुजगावणं', 'इस्कोट' (2000), 'टंचाई' (2008) कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या कथांमधून ग्रामीण जीवनातील ताणतणाव, संघर्ष, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांच्या व्यथा वेदनांचे चित्रण त्यांनी केले आहे. सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, लबाड राजकारणी यांच्याकडून होणाऱ्या

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved 

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV

शेतकऱ्यांच्या शोषणाचे वास्तव चित्रण केलेले आहे. 'बळी', 'पंचनामा', (इस्कोट),'आभाळ', 'भिरुड' (टंचाई) या कथांमधून शेतमालाला रास्त भाव मिळत नाही. दारिद्य, आर्थिक विषमता, असाहाय्यता, सरकारी धोरणाबाबत असंतोष यामुळे होणाऱ्या शेतकरी आत्महत्यांचा विषय हाताळला आहे. 'बळी' कथेतील सखाराम शेतात पिकवलेल्या भुईमुगांच्या शेंगांचा लिलाव होऊन त्याला त्याचे पैसे मिळत नाहीत म्हणून आपल्या मुलासह आत्महत्या करतो. 'पंचनामा' या कथेतील सखाराम दारिद्र्यामुळे दिवाळीसारखा सण साजरा करता येत नाही. घरात गोडधोड, मुलाबाळांना कपडालत्ता घेऊ शकत नाही, सावकार दारात येऊन बसतो. घरातील धान्य विकायला नेले तर शिल्लक बाकी कापून घेतो. अशा जगण्याला कंटाळलेल्या सखारामला जगावं तरी कशापायी? हा प्रश्न पडतो. या विवंचनेत सापडलेला सखाराम फाशी घेऊन आत्महत्या करतो. सीतारामने आत्महत्या केल्यानंतर पंचनामा होऊन 'मयत इसमानं घरगुती कारणाने फाशी घेतली' अशी नोंद केली जाते. या कथेसंदर्भात प्रवीण बनसोड म्हणतात, ''शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला रास्त भाव तर मिळत नाही, पण जी यंत्रणा निर्माण केली आहे, तीही शेतकऱ्यांची आडवणूक करणारी आहे, म्हणून आजचा शेतकरी परिस्थितीने त्रस्त होऊन आत्महत्येला प्रयत्न होत आहे. याचे जिवंत चित्रण उत्तम बावस्कर यांनी 'इस्कोट' या कथासंग्रहातील 'पंचनामा' या कथेतून रेखाटले आहे''[1]

सरकार मात्र शेतकरी आत्महत्यांसाठी निकष लावून या आत्महत्यांमागे इतर कारणे असल्याचे सांगत बोटचेपी धोरण राबविताना दिसत आहे. आत्महत्येमुळे ज्या कुटुंबावर संकट कोसळते त्यांना मदत व पुनर्वसनाच्या कामाची अपेक्षा असताना येथे मात्र विपरीत अनुभव येतो. या आत्महत्या दडपण्याचा, खोट्या ठरविण्याचा प्रयत्न होताना दिसतो. त्याचे राजकारण करण्याचा प्रयत्न होतो.

'आभाळ' टंचाई या कथेमध्ये सावकाराचं कर्ज कसं फेडायचं? आठ दिवसात कुठून आणायचे पैसे?... चोरी करायची का, कुठं दरोडा घालायचा?... त्याच्या ह्या पोरांचंबी नावकरीच या नवीनच निघलंय ! नावकरीला एक लाख रुपये लागत्यात म्हणाला ! कुठून आणायचे एवढे पैसे? अशा संकटात सापडलेला दगडूबा एंन्ड्रीन घेऊन आत्महत्या करतो. दुसऱ्याच दिवशी पेपरात दगडूबाचा फोटू आला... अन् फोटूखाली बातमी व्हती... दगडूबा जाधव या शेतकऱ्याची आत्महत्या ! ...अन् साऱ्या पकश्याच्या मोटरगाड्या दहीगावच्या वाटनं धुरळा उडवत पळू लागल्या! विरोधी पकश्याचे लोक सगळ्यात आदी दगडूबाच्या घरी हजर ! दगडूबा जाधव या शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी पुढारी येतात आणि त्याच्या बायकोची समजूत घालून निघून जातात.

'भिरुड' (टंचाई) या कथेमध्ये कडूबा जाधवच्या दामूची आत्महत्या हा गावात चर्चेचा विषय होतो. सततच्या नापिकीमुळे आणि सावकाराच्या कर्जापाई मी आत्महत्या करत आहे अशी चिठ्ठी सापडते. पोलीस पंचनामा करून पोस्टमार्टमसाठी त्याचं प्रेत नेले जाते. ते परत येईपर्यंत गावातील लोक आत्महत्यासंदर्भात चर्चा करतात. त्यात पोरीच्या लग्नासाठी कर्जबाजारीपणा, दारूचे व्यसन, घरातील भांडण या कारणामुळे औषध किंवा फाशी घेऊन आत्महत्या करतात आणि त्याच्या खिशात चिठ्ठी ठेवली जाते. त्यो तं मेला! तेच्या लेकराबाळांस्नी तरी सरकारी मदत मिळाली पाहिजे, आसं शान्या, सुरत्या, मनवणाऱ्या माणसास्नी वाटतंय ! पोलीस येत्यात.... पंचनामा करतात ! पेपरात बातमीबी येतीया. अमुक–अमुक कास्तकारानं सततच्या नापीकीमुळे अन् सावकाराच्या कर्जापाई आत्महत्या केली. अशी चर्चा होत असताना जो पत्तूर कास्तकाराचा आयदीपणा जात न्हाई अन् करजं बुडावायची नियत बदलत न्हाई तो पत्तूर सरकारनं कितीबी मदत केलेई तरी कायबी फायदा न्हाई असाही अनुभवी सूर निघतो. वाढत्या शेतकरी आत्महत्यांचा परिणाम समाजात होऊन शेतीबद्दल नकारात्मक स्थिती निर्माण झाली. या घटनांचा राजकीय पुढारी राजकारणात वापर करून घेऊ लागले. आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना मिळणाऱ्या मदतनिधी वाटपात भ्रष्ट प्रवृत्ती वाढल्या. वाढत्या माध्यमांच्या या घटनांकडे व्यावसायिक दृष्टिकोन या सगळ्यातून महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, प्रादेशिक विभाग ढवळून निघाले. याचे अत्यंत वास्तववादी चित्र उत्तम बावस्कर यांनी आपल्या कथांमधून रेखाटले आहे. शेतकरी वर्गाची व्यापारी वर्गाकडून होणारी पिळवणूक, भ्रष्टाचार, शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव न मिळणे अशा सर्व पातळ्यांवर शेतकऱ्यांचे शोषण सुरू झाले. यातून वाढत्या शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न निर्माण होत आहे. याचे चित्रण उत्तम बावस्कर यांच्या कथांमधून आले आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण, अवर्षण, नापिकी सारख्या नैसर्गिक संकटाचा सामना करून शेतकरी कसाबसा तग धरतो. मात्र सरकारी अधिकाऱ्यांपासून ते बँकेच्या अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभार सामान्य शेतकऱ्याची बड्या शेतकऱ्यांकडून होणारी पिळवणूक, व्यापारी वर्गांकडून होणारी पिळवणूक, सावकारी, शेतमालाला किफायतशीर भाव न मिळणे या सगळ्या भोवती फिरणारे सामान्य शेतकऱ्याचे दरिद्री जीवन याचे 'बळी', 'पंचनामा', 'सापळा', 'वाटुळ', 'पूर', 'परवड', 'गुंता' यासारख्या कथांमधून बावस्कर यांनी चित्रण केले आहे.

उत्तम बावस्कर यांच्या कथेसंदर्भात डॉ. नागनाथ कोतापल्ले म्हणतात, ''वरकरणी शांत दिसणारे ग्रामीण जीवन आतून विलक्षण धुमसत आहे. मुळातच ग्रामीण माणसाच्या शोषणावर उभी असलेली ही व्यवस्था आता

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV

भ्रष्टाचाराने पुरती सडून गेली आहे.... पारंपारिक गर्मीत मानसिकता आणि नव्याने येऊ घातलेले बदल यातून येथील गरिबांचा आणि दलितांचा प्रत्यक्ष बळी जात आहे. जणू प्रत्येक खेडे म्हणजे कुरुक्षेत्र झाले आहे. या कुरुक्षेत्राच्या भयप्रदतेची झळ लागून स्वतःचे जीवन स्वतःच संपवित आहेत.''[2]

''ग्रामीण जीवनात वर्तमानात अनेक वाटांनी येणाऱ्या समस्या आणि त्यांच्या सोडवणुकीत आयुष्य घालवणाऱ्या ग्रामीण माणसांची व्यथाकुल मने येथे प्रत्ययकारी पद्धतीने साकारली आहेत. सर्वांचा अन्नदाता असणारा बळीराजा त्याच्या जीवनातील प्राथमिक गरजा भागविण्याइतपत सुखी नाही, याचा प्रत्यय देणाऱ्या या कथा आहेत''[3] बावस्कर यांनी समकालीन ग्रामीण वास्तव परिस्थितीने त्रस्त झालेला शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होत आहे याचे प्रभावी चित्रण केले आहे.

**संदर्भ :**

1. बनसोड प्रवीण, जागतिकीकरण : ग्रामीण साहित्य, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी 2009, पृष्ठ 37
2. कोत्तापल्ले नागनाथ, 'इस्कोट', कब्लास प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2000, मलपृष्ठ
3. उत्तम बावस्कर, 'टंचाई', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, मलपुष्ट